**PM-USHA या केंद्रपुरस्कृत योजनेंतर्गत अनुसूचित जमाती घटकाकरीता मंजूर निधीच्या प्रमाणात केंद्र हिस्सा व राज्य हिस्सा राज्य प्रकल्प संचालनालय, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांना उपलब्ध करुन देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण-२०२६/ई- १६६५८४१/विशि-३**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: २७ मे, २०२६.

**पहा**:-

१. भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग शासन निर्णय क्र.F.No.१ (२७)/ PFMS/ २०२० दि.१३.०७.२०२३
२. भारत सरकार, शिक्षा मंत्रालय, उच्च शिक्षण विभाग यांचे पत्र क्र. F.No. २४-२७/ २०२६-U.Policy, दि. ३१ मार्च, २०२६
३. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. ०७.०५.२०२६
४. आदिवासी विकास विभाग, शासन परिपत्रक, बीयुडी-२०२६/प्र.क्र.६१/कार्यासन-६, दिनांक १३.०५.२०२६

**प्रस्तावना**:

प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) या केंद्र पुरस्कृत योजनेकरिता केंद्र हिस्सा ६० टक्के व राज्य हिस्सा ४० टक्के प्रमाणात निधी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानच्या SNA खात्यात कोषागारामार्फत देयक सादर करुन आहरीत करण्यात येत होता. आता या योजनेकरीता SNA-SPARSH या प्रणालीद्वारे निधी वितरीत होणार आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षामध्ये या योजनेसाठी केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये अनुसूचित जमाती घटक योजनेसाठी रु. ७७,६२,५००/- इतकी Mother Sanction वितरीत करण्यात आली आहे.

त्यानुसार, अनुसूचित जमाती घटक योजनेसाठीचा केंद्र हिस्सा रु. ७७,६२,५००/- व त्यासमरुप राज्य हिस्सा रु.५१,७५,०००/- इतकी तरतूद राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर

शिक्षा अभियान, मुंबई यांना अर्थसंकल्पिय अंदाज, वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u> :-**

केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये प्राप्त PM-USHA या केंद्र पुरस्कृत योजनेच्या अनुसूचित जमाती घटकासाठीच्या केंद्र हिस्साचे अनुदान रु. ७७,६२,५००/- (रुपये सत्त्याहत्तर लक्ष बासष्ट हजार पाचशे फक्त) व त्यासमरुप राज्य हिस्साचे अनुदान रु. ५१,७५,०००/- (रुपये एक्कावन्न लक्ष पंचाहत्तर हजार फक्त) इतका निधी राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, मुंबई यांना अर्थसंकल्पिय अंदाज वितरण व संनियंत्रण प्रणालीवर (BEAMS) वितरित करण्यास राज्य शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. उपरोक्त केंद्र हिश्याचा निधी मागणी क्र.टी-५ २२०२- सर्वसाधारण शिक्षण ०३- विद्यापीठ व उच्च शिक्षण ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (०४) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहाय्यक अनुदान (केंद्र हिस्सा ६० %) (कार्यक्रम) २२०२ एल ३६२ या लेखाशीर्षाखालील सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून वितरीत करण्यात येत आहे. तर, राज्य हिश्याचा निधी मागणी क्र.टी-५ २२०२- सर्वसाधारण शिक्षण ०३- विद्यापीठ व उच्च शिक्षण ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना (०१) (०४) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत अशासकीय संस्थांना सहाय्यक अनुदान (राज्य हिस्सा ४० %) (कार्यक्रम) २२०२ एल ३७१ या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर तरतूदीतून वितरीत करण्यात येत आहे.

३. वरील अनुदानाची सर्व कागदपत्रे व हिशोब महालेखापाल, महाराष्ट्र -१ किंवा प्रकरणपरत्वे महालेखापाल-२, नागपूर यांनी सदर कामाकरीता प्राधिकृत केलेले अधिकारी यांना तपासण्याचे अधिकार असून त्यांनी मागणी केल्यास, सर्व कागदपत्रे त्यांचेकडे तपासणी करीता राज्य प्रकल्प संचालक (रुसा) यांनी सादर करावीत.

४. राज्य प्रकल्प संचालक (रुसा) यांना केंद्र शासनाने ज्या प्रयोजनार्थ निधी मंजूर केला आहे त्या निधीचा वापर त्या प्रयोजनासाठी करावा. खरेदी व बांधकामाची मान्यता विद्यापीठ लेखासंहितेनुसार सक्षम प्राधिका-यामार्फत घेण्यात यावी.

५. तसेच, उद्योग, उर्जा व कामगार विभागाच्या दि.०१.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदी व त्यासोबतच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे तसेच तद्नंतर वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांनुसार सदरची खरेदीप्रक्रीया विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर पार पाडावी व विहित कालावधीमध्ये सदरचा खर्च पुर्णपणे करण्यात येईल याची दक्षता घेण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय आदिवासी विकास विभागाच्या परिपत्रक क्र. बीयुडी-२०२६/ प्र.क्र.६१/ कार्यासन-६, दिनांक १३.०५.२०२६ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०५२७१५१९४६७९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP
PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT,
2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.05.27 15:20:24 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति :**

१. मा. मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्रक्षशिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) संचालनालय, मुंबई.
५. महालेखापाल (लेखा वअनुज्ञेयता) / लेखापरीक्षा, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
६. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
८. वित्त विभाग,(व्यय-५), (अर्थसंकल्प-३/८), मंत्रालय, मुंबई.
९. आदिवासी विकास विभाग (कार्यासन-६), मंत्रालय, मुंबई
१०.अवर सचिव (अर्थसंकल्प कक्ष), उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११.निवड नस्ती (विशि -३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.